मराठे प्रतिष्ठान मुंबई यांचे मुखपत्र

परस्परं भावयन्तः

म प्र

# हितगुज

अंक २८ ● संपादक : लक्ष्मण शंकर (पृष्ठ ५२०) ● डिसेंबर १९९६

(व्यक्तींची नावे देताना 'मराठे' आडनाव वगळले असून कंसात कुलवृत्तांतातील माहितीचा पृष्ठ क्रमांक दिला आहे.)

(फक्त खाजगी वितरणासाठी)

## गुणवंताच्या पाठीवर कौतुकाची थाप


रोहित प्रमोद


समीर दत्तात्रय


दीप्ती अनंत


अल्पना उदय

१९९५-९६ च्या विविध परीक्षांतली गुणवत्ता पारितोषिके प्रतिष्ठानचे अध्यक्ष सुरेशभाऊंच्या हस्ते वार्षिक सर्वसाधारण सभेनंतर (३.११.९६) देण्यात आली. (तपशील पृ. १४-१५)


हेमलता विनायक


अमेय अनंत


अमित अशोक


मनीष रवींद्र

**मराठे प्रतिष्ठान**

पब्लिक ट्रस्ट नोंदणी क्र. ई. ७९१८ (मुं. ता. १२/१/१९८१)

मराठे उद्योग भवन, आप्पासाहेब मराठे मार्ग, प्रभादेवी, मुंबई ४०० ०२५. दूरध्वनी : ४३०२४५३.

Marathe Pratishthan

# प्रतिष्ठान वृत्त

## १४ वी वार्षिक सर्वसाधारण सभा

मराठे प्रतिष्ठानची १४वी वार्षिक सर्वसाधारण सभा दि. ३ नोव्हेंबर १९९६ रोजी सकाळी १०.३० वाजता मराठे उद्योग भवन, प्रभादेवी, मुंबई येथे झाली. टपालखात्याच्या अचानक संपाची अडचण येऊनसुध्दा सभेला नेहणीप्रमाणेच उपस्थिती होती. (२६ सभासद)

शैक्षणिक सहाय्याकरिता पालकांची मासिक प्राप्ती रू. १०००/- पर्यंतच असावी ही अट कार्यकारी मंडळाने एकमताने रद्द केली आहे. त्याची माहिती सभेला देण्यात आली. हा अडथळा दूर झाल्याचे समाधान सर्व सभासदांनी व्यक्त केले. सभेमध्ये व्यक्त करण्यात आलेल्या इतर सूचना पुढीलप्रमाणे - तरूणवर्गाला व्यवसाय विषयक मार्गदर्शन करण्याकरिता सल्लागार मंडळ असावे, वार्षिक सभेला जोडून विविध करमणुकीचे कार्यक्रम ठेवावे, प्रतिष्ठानच्या मदतीसाठी मुंबई शहरात सशुल्क करमणुकीचा कार्यक्रम उदा. नाटक वगैरे आयोजित करावा, प्रमुख शहरांमध्ये विभागीय मेळावे घ्यावे, सहली काढाव्या. शैक्षणिक साधने उदा. पुस्तक पेढी उपलब्ध करून द्यावी. किमान २५ गरजू वृध्दांची सोय होईल असा वृध्दाश्रमाचा प्रकल्प हाती घ्यावा वा एखाद्या तत्सम संस्थेमध्ये प्रतिष्ठानच्या वृध्द सभासदांची सोय करता येईल का या दृष्टीने प्रयत्न व्हावे. याबाबतीत हितगुजमध्ये प्रसिध्दी द्यावी. या सर्व सूचनांचा कार्यकारी मंडळ सहानुभूतीने विचार करील असे आश्वासन अध्यक्ष महाशयांनी दिले.

सभेनंतर गुणवत्ताधारक विद्यार्थ्यांना पारितोषिके देण्यांत आली. त्यानंतर अल्पाहाराचा गोड कार्यक्रम पार पडला. कै. श्रीपाद चिंतामणी (पृ. ५०३) यांच्या इच्छेनुसार त्यांनी प्रतिष्ठानला दिलेल्या देणगीच्या व्याजातून रु. ५००/- एवढी रक्कम यासाठी खर्च करण्यात येते.

## कार्यकारी मंडळ

दर महिन्याच्या दुसऱ्या शनिवारी ४ वाजता प्रभादेवी येथील प्रतिष्ठानच्या कार्यालयांत कार्यकारी मंडळाची सभा होत असे. या तिमाहीपासून ४थ्या शनिवारीहि सभा घेण्याचे ठरवले. या वेळी कोणीही कुलबांधव प्रतिष्ठानच्या पदाधिकाऱ्यांना भेटण्यास येऊ शकतो. मागील तिमाहीत सप्टेंबर १४ व २१, ऑक्टोबर १२ व २६ आणि नोव्हेंबर २३ रोजी कार्यकारी मंडळाच्या सभा झाल्या. दिवाळीमुळे ९ नोव्हेंबर रोजी सभा झाली नाही.

## शैक्षणिक मदत

बडोदे येथील कुलबांधव प्रभाकर त्र्यंबक यांचा मुलगा प्रशांत (पृ. २४८) याने त्याची तृतीय वर्ष बी.कॉम.ची फी रु. ४५० प्रतिष्ठानकडून मिळावी अशी अपेक्षा व्यक्त केली होती. त्यानुसार त्याला ही रक्कम शैक्षणिक मदत म्हणून देण्यांत आली.

## हितगुज

एक हजार वर्गणीदारांचे उद्दिष्ट पूर्ण करण्याच्या प्रयत्नांना चांगला प्रतिसाद आहे. गेल्या दोन तिमाहीत २५/२५ नवीन वर्गणीदार झाले. आता वर्गणीदार संख्या ५५० वर पोचली आहे. माहेरवाशिणीहि आता वर्गणीदार व्हायला पुढे येत आहेत. मात्र वर्षभरात हजार वर्गणीदार करण्याचे दृष्टीने अजून वेग वाढवायला हवा.

हितगुज संवर्धन निधीलाहि प्रतिसाद चांगला मिळत आहे. गेल्या तिमाहीत खालील तीन सभासद/ वर्गणीदारांकडून एकूण रु. १६०१ देणगी रक्कम मिळाली.

१. श्रीमती वैशाली श्रीराम (पृ.४२८) मुंबई रु. ५०१
(कै. श्रीराम वासुदेव यांच्या १५.१०.९६च्या ५५व्या जन्मदिनी)
२. सुधीर श्रीपाद (पृ.२०) कराड रु. १००
३. उदय दत्तात्रय (पृ.३२६) मुलुंड, मुंबई रु. १०००

## वर्धापन दिन २६.१.९७

प्रतिष्ठानचा पुढील वर्धापन दिन २६ जानेवारी १९९७ रोजी पुणे शाखेच्या पुढाकाराने धूमधडाक्यांत साजरा होणार आहे. पुणे शाखेतर्फे यासाठी सर्व कुलबांधवांना जाहीर निमंत्रण देण्यांत आले आहे. त्याला प्रतिसाद देणे सर्व कुलबांधवांचे कर्तव्यच नाही काय?

### चुकीची दुरुस्ती


मागील अंकात पृ. १ वर हितगुज संवर्धन निधीसाठींच्या देणग्यांचा तपशील दिला आहे. त्यातली श्री. गणेश विनायक (पृ.११५) मुंबई यांनी दिलेली रु. १००० ची देणगी **मानसकन्या स्वागताच्या विवाहानिमित्त** दिलेली आहे. अनवधानाने प्राजक्ताच्या विवाहानिमित्त असे छापले गेले याबद्दल दिलगीर आहोत. - संपादक



Marathe Pratishthan

# सभासद वृत्त

## सुरेशभाऊंची गरूडझेप



स्विफ्ट्सच्या नाशिक प्रकल्पाचे उद्‌घाटन करताना श्री. वरेरकर. त्यांच्या उजवीकडे सुरेशभाऊ आणि डावीकडे वसंत सुरेश.

मराठे उद्योग समूहांतली एक कंपनी स्विफ्ट्स् लिमिटेडने अंबड, नाशिक येथे ए. एम्. माल्टिग्राफिक्स या अमेरिकन कंपनीच्या तांत्रिक सहयोगाने ऑफसेट छपाईयंत्र निर्मितीचा विस्तारित प्रकल्प हाती घेतला आहे. स्विफ्ट्स्चे तरुण संचालकद्वय यशवंत व वसंत यांनी अमेरिकेत याबाबतच्या करारावर सह्या केल्याचे वृत्त हितगुज जून १९९५ मधे वाचल्याचे आपल्या स्मरणात असेलच.

नुकतेच या प्रकल्पाचे उद्‌घाटन सारस्वत को ऑपरेटिव्ह बँकेचे अध्यक्ष श्री. एन्. आर. वरेरकर यांच्या हस्तें नाशिक येथे झाले. यानिमित्त मराठे प्रतिष्ठानच्या कार्यकारी मंडळाने स्विफ्ट्स्चे अध्यक्ष व प्रतिष्ठानचे आधारस्तंभ **सुरेश सखाराम (पृ. ३९९) यांचे पुष्पगुच्छ व मिठाई देऊन हार्दिक अभिनंदन** केले.

देशांत प्रथमच ऑफसेट छपाई यंत्रांची निर्मिती करून भारत सरकारचे आयात-पर्याय पारितोषिक मिळवणारी स्विफ्ट्स् कंपनी आतां जागतिक बाजारपेठेत ही यंत्रे निर्यात करणार आहे. सुरेशभाऊंची ही गरुडझेप सर्व कुलबांधवांना निश्चितच अभिमानास्पद आहे.

"मराठे परिवारांतल्या तरुणवर्गाने नोकरीच्या पाशांत अडकून न राहतां उद्योग-व्यापारांत बाजी मारावी अशी उत्कट इच्छा, सुरेशभाऊ तुम्ही प्रतिष्ठानच्या प्रत्येक सभा-संमेलनात व्यक्त करतां. तुमचा आदर्श नव्या पिढीला उद्योगक्षेत्रांत पदार्पण करण्यासाठी प्रेरणादायी ठरल्यावाचून राहणार नाही. सुरेशभाऊ, तुमचा आम्हाला अभिमान वाटतो." या शब्दांत कार्यकारी मंडळाने सुरेशभाऊंबाबतच्या अखिल मराठे परिवाराच्या भावना व्यक्त केल्या.

"बाहेर होणाऱ्या मोठमोठ्या सत्कारापेक्षा कुटुंबांतल्या वडिलधाऱ्यांकडून होणाऱ्या कौतुकाचे, घरच्या अहेराचे मोल अनमोल आहे. त्यांत औपचारिकता वा दिखाऊपणा नसतो. असतो विशुध्द आपलेपणा आणि प्रेमाचा ओलावा" अशा शब्दांत सुरेशभाऊंनी आपली कृतज्ञता व्यक्त केली.

## हरि कृष्ण यांची हॅट्रिक

**प्रतिष्ठानचे बेळगांवमधील सदस्य हरी कृष्ण** (पृ. ४२७) वय वर्षे ७० यांनी ऑक्टोबर १९९६मधे

## जाहीर निमंत्रण
## वर्धापन दिन समारंभ - पुणे शाखा

मराठे प्रतिष्ठानचा १८वा वर्धापन दिन रविवार दिनांक २६ जानेवारी १९९७ रोजी साजरा होणार आहे. त्या निमित्ताने उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या व्यक्तींचे सत्कार, मनोगते, चित्रकला प्रदर्शन व काही करमणुकीचे कार्यक्रम सादर केले जाणार आहेत. या कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान पुण्यातील नामवंत हृदयरोग तज्ञ डॉ. ह. वि. सरदेसाई हे भूषविणार आहेत. तरी आपण या कार्यक्रमास सहकुटुंब व मित्रमैत्रिणींसमवेत उपस्थित राहून कार्यक्रमाची शोभा वाढवावी. कार्यक्रम विनामूल्य आहे.

**मनोगताचा विषय** - 'मी प्रतिष्ठानसाठी काय करू शकतो/शकते' किंवा 'आपण प्रतिष्ठानसाठी काय करू या!'

**सूचना** - मनोगत व्यक्त करण्यासाठी प्रत्येकी ५ मि. वेळ दिला जाईल. ज्यांना मनोगत व्यक्त करण्याची इच्छा असेल त्यांनी कृपया सौ. नीलांबरी मराठे यांच्याकडे आधी कळवावे ही नम्र विनंती.
(फोन ४५६२७०. पत्ता - व्यंकटेश मार्गदर्शन केंद्र, ६४३ नारायण पेठ, प्राथमिक नूमवि समोर, पुणे३०)

**कार्यक्रमाचे स्थळ** - वेदशास्त्रोत्तेजक सभेचे सभागृह पेशवे पार्क चौक, हॉटेल विश्व समोर, म्युनिसिपल स्पोर्टस् ग्राऊंडनजीक, पुणे ३०.

**कार्यक्रमाची वेळ** - सायंकाळी ४ ते ७

Marathe Pratishthan

धारवाड येथे झालेल्या १८व्या ऑल इंडिया व्हेट्रन्स अॅथलेटिक चँपियनशिप स्पर्धेत भालाफेक आणि थाळीफेकीत रौप्यपदक आणि गोळाफेकीत कांस्यपदक अशी तीन पदके मिळवून 'डबल हॅट्रिक' केली. या स्पर्धांत पदके मिळवण्याचे त्यांचे हे लागोपाठ तिसरे वर्ष.

**सिध्दिविनायकाचे विश्वस्त -'पंत' मराठे**

प्रतिष्ठानचे **मुंबईतील सदस्य विष्णु बाळकृष्ण** (पृ. ३५९) यांची महाराष्ट्र शासनाने "सिध्दिविनायक मंदिर ट्रस्ट", मुंबई चे विश्वस्त म्हणून नियुक्ती केली आहे. मुंबई महानगरपालिकेतून निवृत्त झाल्यानंतर विष्णुपंतांनी सार्वजनिक कार्यांत स्वतःला गुंतवून घेतले. ते सध्या मुंबई भाजपाचे कोषाध्यक्ष म्हणून कार्यरत आहेत.

**मुंबईच्या नगरपाल - उषा किरण**

मराठ्यांची माहेरवाशीण, **पुण्यांतील (चिंचवड) कुलबांधव कै. बाळकृष्ण विष्णू (पृ. १९०) यांची कन्या उषा किरण** (उषा मनोहर खेर, मुंबई) यांची महाराष्ट्र शासनाने मुंबईच्या नगरपालदी नियुक्ती केली आहे. मराठी, हिंदी व थोडीफार गुजराथीहि चित्रपटसृष्टी आपल्या नृत्याभिनयाने सुमारे ३० वर्षे गाजवणाऱ्या उषा किरण यांचे 'उषःकाल' हे आत्मचरित्रहि वाचनीयता व लिखाणातील प्रामाणिकपणा यांमुळे लोकप्रिय झाले.

उषा किरण या खाजगी जीवनातहि यशस्वी आदर्श गृहिणी आहेत. त्यांच्या व्यक्तिमत्वांत मध्यमवर्गीय साधेपणा व छानसा आब आहे. इंग्रजीसह पाच-सहा भाषा त्यांना अवगत आहेत. मुंबईच्या समाज-जीवनांत त्या समरसून गेल्या आहेत. सणा-समारंभा निमित्ताने होणाऱ्या ध्वनिप्रदूषणाला आळा घालण्यासाठी काहीतरी करण्याचा त्यांचा मानस आहे. 'पोस्टांतील मुलगी' अथवा 'कन्यादान' अशा सिनेमांत त्यांनी ज्या खंबीर व स्वयंसिध्द व्यक्तिमत्वाच्या भूमिका पार पाडल्या त्याच तडफेने व खंबीरपणाने त्या ध्वनिप्रदूषणाला आळा घालण्याचे उद्दिष्ट साध्य करण्यात सफल होतील व मुंबईकरांचा दुवा घेतील अशी आशा करूया.

**नांदा सौख्य भरे**

प्रतिष्ठानचे विरार जि. ठाणे येथील सदस्य **जनार्दन गोविंद (पृ. ४०५) यांचा मुलगा गुणवंत** यांचा विवाह कै. हनुमंत दिनकर जोशी, पालघर, यांची कन्या भावना हिच्याशी २६.११.१९९६ रोजी संपन्न झाला. नवपरिणीत दांपत्यास मराठे परिवारातर्फे शुभेच्छा.

**सहवेदना**

(१) प्रतिष्ठानचे अंधरी, **मुंबई येथील सदस्य श्रीराम वासुदेव (पृ. ४२८)** यांचे हृदयाच्या विकाराने अल्पशा आजाराने २६.१.१९९५ रोजी अवघ्या ५४व्या वर्षी निधन झाले. ते मुंबईच्या सरदार पटेल कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग मधें प्राध्यापक होते. तसेच **त्यांच्या मातोश्री आनंदीबाई** यांचेहि ३०.३.१९९५ रोजी आकस्मिक निधन झाले. त्यांचे वय ७८वर्षे होते. पुत्र श्रीराम यांच्या अकाली निधनामुळे त्या मनाने खचल्या होत्या.

(२) प्रतिष्ठानचे वरळी (कोळीवाडा), **मुंबई येथील सदस्य अनंत वामन (पृ. ४००) यांच्या मातोश्री सुशिलाबाई** यांना दि. २४ जानेवारी १९९६ रोजी देवाज्ञा झाली.

(३) प्रतिष्ठानचे **पुण्यांतील (हडपसर) सदस्य शशिकांत गोविंद (पृ. १८४) यांच्या मातोश्री श्रीमती सुमतीबाई** यांचे दि. ११.६.१९९६ रोजी निधन झाले.

(४) प्रतिष्ठानचे **माटुंगा, मुंबई येथील सदस्य जयंत पुरंदर (पृ. १८०) यांच्या मातोश्री श्रीमती वसुंधराबाई** यांचे अल्पशा आजाराने दि. १६.८.१९९६ रोजी वयाच्या ८२व्या वर्षी निधन झाले. पुण्यांतील प्रसिध्द अॅक्युअरी मराठे (गणेश सदाशिव - मराठे कुलवृत्तांताच्या १ल्या आवृत्तीच्या कामाला १९४० मधे चालना देऊन ते पूर्ण करून घेणारे) यांच्या त्या सूनबाई. वक्तृत्व, लेखन - वाचन यांची त्यांना विशेष आवड होती. अखिल भारतीय विद्यार्थी परिषदेच्या 'सेवाभारती' शाखेत त्या विश्वस्तपदावर होत्या. अखेरपर्यंत त्या कार्यरत होत्या.

(५) गिरगांव, **मुंबईतील ब्राम्हण सभेचे आजीवन स्वयंसेवक कार्यकर्ते अच्युत भास्कर** (पृ. ३२९) यांचे ब्राम्हण सभेच्याच नर्सिंग होम मधे १६.१०.९६ रोजी निधन झाले. गेली तीन वर्षे ते तिथे आजारी होते. मागील (सप्टेंबर) अंकातील त्यांच्या कार्याबद्दलचे चार गौरवशब्द त्यांना पहायला मिळाले हे आमचे भाग्य.

**वरील सर्व कुटंबीयांच्या दुःखांत अखिल मराठे परिवार सहभागी आहे.**



Marathe Pratishthan

# पर्यावरण विशेषज्ञ डॉ. एकनाथ व्यंकटेश

***प्रतिष्ठानचे कॅनडातले सभासद डॉ. एकनाथ व्यंकटेश (पृ. ३८९) यांना कॅनडाच्या फेडरल गव्हर्मेंटने १९९६ मध्ये कॅनेडियन हेल्दी एन्व्हायरमेंट ॲवॉर्ड देऊन गौरवल्याची बातमी हितगुजाच्या मागील (सप्टेंबर १९९६) अंकात दिली होती. त्यांना हे प्रशस्तीपत्र Individual Commitment कॅटेगरीमध्ये शिक्षक व शास्त्रज्ञ म्हणून देण्यांत आले. या पारितोषिकाबाबत आणि त्यांच्या स्वतःच्या शास्त्रीय शिक्षण व पर्यावरणविषयक कर्तबगारीबाबत त्यांनी पाठवलेली माहिती त्यांच्याच शब्दात - अगदी अमेरिकन स्पेलिंगसह!***

**Education:** B.Sc. (Bombay); M.Sc. (Poona); Ed.D. (State University of New York at Buffalo) Physicist, Science Educator.

**Birth Place and Date:** Bombay, India; June 1, 1923.

**Currently Consultant:** Science, Technology, and Society Education.

**Experience:**
1) Research: Scientific Instruments Industry, 2 years
2) Scientific Research: National Chemical Laboratory of India(3years), Nuclear Research Lab, McMaster University, Canada (1 year)
3) Teaching: University, India and Canada, (7 years), community Collate, Canada, (6 years), Secondary Education, Canada, (27 years)
4) Visiting Professor, University of Poona, India 1984.
5) Prepared TV Science Education programs for University Grants Commission of Government of India, which were broadcast on DURDARSHAN, Indian TV Network.

**Publications:** Scientific Research Papers. (3), Scientific Articles (9), Papers for Workshops, and Seminars, National and International conferences in Canada, USA, Iserael (twice), Australia and New Zealand (twice), West Germany, Philippines, USSR, France (UNESCO), The Netherlands, and Thailand. (42)

THE CANDIAN HEALTHY ENVIRONMENT AWARDS

The awards are a component of Environment Canada's Action 21 Program. Action 21 was launched by Environment Canada in response to the federal government's commitment to communicate the individual and collective actions needed for sustainable development. Action 21 consists of two parts: Public Awareness Initiative and Community Funding Program. Under the first part, The Candian Healthy Environment Awards are presented in six categories; viz

(1) Non-profit Organizations;
(2) Arts, Media and Communications;
(3) Corporate Leadership;
(4) Environment Leadership by a Municipality;
(5) Youth Leadership;
(6) Lifetime Achievement;
(7) Action by Children;
(8) Individual Commitment.

Marathe Pratishthan

**Delegation member:** Science, Technology, and Society Education representing Canada, to (1) People's Republic of China, 1987. and (2) Australia and New Zealand, 1989.

Invited participant, International Forum for Project 2000+"Scientific and Technological Literacy For All", UNESCO, Paris, France, 1993, representing Canada, IOSTE (International Organization for Science and Technology Education), and ICASE. (International Council of Associations for Science Education).

Member of 14 professional associations. Elected, Life Member of National Science Teachers Association (NSTA, USA)

Twice nominated for Science Teaching award, Professional Engineers of Ontario.

Recipient of Science Teachers' Association of Ontario Service Award for outstanding contribution to Science Education in Ontario 1988.

Recipient of The Canadian Healthy Environment Award, a component of Environment Canada's Action 21, June 1996.

Appointed Member of Waste Management Master Plan Advisory Committee, Niagara Region, 1986-88.

Appointed Member of the following sub-committees of Ecological And Environmental Advisory Committee (EEAC) of the Regional Municipality of Niagara, Feb. 1990 - December 1991 (1) Waste Management (2) Water and Waste Water Management and (3) Sustainable Development.

Prepared a Report on "Engery From Waste" June 1992.

Appointed Member, Lakeview Thermal Generating Station, Ash Management Study: Public Advisory Committee, Ontario Hydro, representing Niagara Regional Municipality, 1991-92.

Appointed Member, Ecological and Environmental Advisory Committee, (EEAC) Regional Municipality of Niagara, 1992-94, and reappointed for period 1995-97.

Frequent contributor to Collected wisdom column of the Globe and Mail (from February 10, 1994 onward)

☆☆☆

**ना-खुषी(?)पत्र**

आपल्या नोव्हेंबर ९६ च्या अंकातील मजकूर वाचून आश्चर्य वाटले. आपली मदत करण्याची इच्छा प्रामाणिक असली तरी मुंबईत कोणालाही १००० रुपयापेक्षा पगार जास्त आहे. तेव्हा (शैक्षणिक) मदतीसाठी उत्पन्नाची रक्कम कालमानाप्रमाणे वाढवावी नाहीतर ही एक जाहिरात ठरेल. - एक हितचिंतक

***नोव्हेंबर 'अंक' नसून आपण वाचलेला मजकूर १९९४-९५ च्या वार्षिक अहवालांतला आहे. नजरचुकीने तो जसाच्या तसा १९९५-९६ च्या वार्षिक अहवालांत छापला गेला. हितगुज सप्टेंबर अंक (पृ. १) अगर हा अंक (प्रतिष्ठान वृत्त) वाचावे. आपले समाधान झाल्यावर तरीआपण 'नामानिराळे' न राहता प्रगट व्हावयास हरकत नसावी. - संपादक***

Marathe Pratishthan

# आजीचा विमानप्रवास - वैकुंठप्राप्तीसाठी!

***आपले 'बंगाली आजोबा' (पहा हितगुज जून १९९४) दिवाळीत मित्रमंडळींना 'दिवाळी व नूतन वर्ष सुखाचे जावो' अशा गुळगुळीत झालेल्या शुभेच्छा न पाठवता बरोबर चक्क काहीतरी चमचमीत फराळच पाठवतात. चकल्या, कडबोळी असे फराळाचे परंपरागत पदार्थ- नाशवंत. पोस्टाच्या 'कार्यक्षमते'मुळे ते नासण्यापूर्वी पोचतील की नाही ही धास्ती! म्हणून ते पाठवतात टिकावू असा 'वाङ्मयीन' फराळ!***

***यंदाच्या दिवाळीत सौ. रोहिणी आणि गजानन भास्कर (पृ. ४२७), घाटकोपर, मुंबई (फोन ५१६३९०७) यांनी आम्हाला पाठवलेला हा 'साहित्यिक फराळ' तुमच्यापुढे वाढला आहे. आवडल्याचे 'गभां'ना कळवा. म्हणजे पुढच्या वर्षी तुम्हाला 'डायरेक्ट' फराळ ऐन दिवाळीत मिळायची सोय होईल. - संपादक***

आजी आता ऐंशी वर्षाच्या होणार. पण प्रकृती ठणठणीत. दृष्टी, कान, तीक्ष्ण. दररोज वर्तमानपत्रे, पुस्तके, मासिके वाचणार. टी.व्ही. वर मालिका, सिनेमे, जाहिराती, बातम्या सर्व काही कार्यक्रम बघणार. नातवाचा पर्सनल कॉम्प्युटर सुध्दां शिकण्याची तयारी. पण इंग्रजीमुळे अडले. कारण ती फक्त व्हर्नाक्युलर फायनल पर्यंत शिकली होती. माहेर अन्तु बर्व्याच्या रत्नागिरीचे असल्यामुळे, प्रेमळ पण कोणाचीही भीडभाड नाही, रोख ठोक बोलणे. आजीचा मोठा नातू एम. बी. ए. होऊन मोठ्या पदावर. दर आठ दिवसांनी दिल्लीला वारी. त्याने हट्ट धरला की, आजीला वाढदिवसादिवशी विमानाने दिल्लीला तिच्या नातीकडे न्यायचे. नातजावई दिल्लीला अधिकारी. आजी विमानाचे भाडे ऐकून म्हणाली, उगीच खर्च नको. पण नातवाच्या हट्टामुळे तयार झाली. अजूनपर्यंत ती विमानांत बसली नव्हती.

नातू व आजी विमानतळावर गेले तर विमान तांत्रिक बिघाडामुळे दोन तास लेट. "मुंबईच्या लोकल्स सारखी ही विमाने" - आजीची कुरकुर! सिक्युरीटी चेकला आजी वैतागली. "मी म्हातारी काय पिस्तुल, सुरा, बॉम्ब घेऊन कां जाणार आहे?"

विमानप्रवासाच्या दोन दिवस आधीच आय. ए. सी. चा वारंवार होणारा संप मिटला होता. त्यामुळे विमानांत स्वच्छता नव्हती. आजीने स्वतःच्या पदराने सीट व खिडकीची कांच पुसली. "एस. टी. व विमानांत काय फरक? पैसे मात्र शंभर पट जास्त." इति आजी. नातू म्हणाला आजी आतां कांही काळज्या करू नको. आरामांत बस. दोन तासांत दिल्ली. सिटचा पट्टा लावतांना हवाई सुंदरीने आजीला मदत केली. त्या हवाई सुंदरीचा पदर सारखा खाली पडत होता. ते बघून आजीने तिला 'चांगला नवरा मिळेल' असा आशीर्वाद देतादेतांच, 'पदराची काळजी घे' असा अनाहूत सल्लाही दिला.

"आजीबाई धन्यवाद. पिन तुटली आहे म्हणून पदर खाली पडतो, नाहीतर नेहमी अगदी घट्ट असतो." - हवाई सुंदरी.

नातवाने आजीला दम दिला. "ही कांही तुझी सून नाही पदराबद्दल बोलायला." (सुना आता आजी झाल्या होत्या तरी ह्या मोठ्या आजीपुढे पदर सांभाळूनच जावे लागे) आपल्या हवाई सुंदरी गोल साडीत असतात. परदेशी तर स्कर्ट व ब्लाऊज वापरतात.

"नऊवारी साड्या त्यांनी वापराव्या. विमानांतून फेऱ्या मारतांना किती सोयीच्या" - आजी.

"नऊवारी साड्या महाराष्ट्रांत बाकी बव्हंशी पांच वारीच." - नातू. यावर आजीची सूचना - "ज्या गांवी विमान जात असेल, त्याप्रमाणे साड्या नेसाव्या. कलकत्याला जातांना बंगाली पध्दतीची, मद्रासला दाक्षिणात्य पध्दतीची, मुंबईला नऊवारी, दिल्लीला पांचवारी. म्हणजे भारताची विविधता दिसेल. परदेशी प्रवासी खूष होतील. टी.व्ही. वर जपान, सिंगापूर, थायलंड, सिलोन ह्यांच्या जाहिरातीत, त्याच देशाचा पोषाख हवाई सुंदरी वापरताना दिसतात ना! आपला एक एक प्रांत त्यापेक्षा मोठा, मग वैचित्र्य कां असू नये?" मी आतां दिल्लीला जातेच आहे तर मुंबईच्या खासदाराला भेटून हा प्रश्न लोकसभेत काढायला सांगते. नाहीतरी मत मागायला आला होता तेंव्हा, "केंव्हाही तुमच्या सूचना, तक्रारी द्या" असे सांगून गेला होता. नातू हे ऐकून गार!

Marathi Pratishthan

## 'आदर्श माता' निबंध स्पर्धा

'मातृदेवो भव', 'स्वामी तिन्ही जगाचा आईविना भिकारी' अशा शब्दांत आईचे वर्णन केले जाते. मात्र प्रत्येक आई जिजाबाई, अहिल्याबाई होळकर, झाशीची राणी यांचेप्रमाणे आदर्श आई असेलच असे नाही. मग **आदर्श माता कशी असावी? याबाबत काय निकष असावे?** शक्यतो स्वतःच्या अनुभवावर वा माहितीवर आधारित विचार हितगुजकडे पाठवावे. शब्दमर्यादा ६०० शब्द. **अंतिम तारीख १५ फेब्रुवारी १९९७.**

प्रतिष्ठानचे कार्योपाध्यक्ष गणेश विनायक (पृ. ११५) यांच्या सौजन्याने उत्कृष्ट निबंधांना रु. ३००, २०० व १०० अशी भरघोस पारितोषिके.

**(सूचना : आपले पत्र, पूर्ण नांव व पत्ता स्वतंत्र कागदावर असावा. निबंधावर नाव, पत्ता नसावा.)**

वाचायला ठेवलेल्या पेपरमध्ये मराठी पेपरच नाही. आजीने दम दिला "मुंबईहून सुटणाऱ्या विमानांत मराठी पेपर नसतील, तर विमान उड्डाण करू देणार नाही", अशी भूमिका घ्यायला मी शिवसेनेच्या बाळासाहेबांना सांगते. त्यांच्याशिवाय कोणाच्या अंगात दिल्लीकरांचा कान पिळायची ताकद नाही. नाहीतर बॉम्बेचे मुंबई कधीच झाले नसते.

जेवणांत फडफडीत पुलाव, बेचव करी, शिळे कटलेस बघून, आजी नाराज "कांही नाही तर झुणका भाकर द्या मेल्यांनो." नातू गंमतीत म्हणाला "आजी देशांत परत फेर निवडणुका होणार, आणि भगवा दिल्लीवर फडकणार. मग झुणका भाकर काय, श्रीखंड पुरीही विमानांत मिळेल."

नातू म्हणाला, "आजी आतां तासाभरांत दिल्ली येईल. जरा खालचा देखावा पहा." विमानांतून दिसणारी शेते, नद्या, शहरे, घरे बघून आजीचा मूड प्रसन्न झाला. आणि जरी टीका केली, तरी विमानप्रवासाने वाचविलेला वेळ, आरामदायी प्रवास, बघून ती मनोमनी खूष झाली.

दिल्लीच्या विमानतळावर आलेली नात व नातजावई म्हणाले. "आजी एकविसाव्या शतकाकडे जातांना, किती प्रगती झाली आहे? तू विमानाने दिल्लीला दोन तासांत आलीस. आतां अर्ध्या तासांत मुंबईहून रत्नागिरीस माहेरी जाऊ शकशील."

"हल्लीच्या प्रगतीचे कौतुक नको. आपले पूर्वज खूप हुषार होते. राम लंकेहून सीतेला घेऊन पुष्पक विमानाने अयोध्येला आले. तुकाराम तर विमानाने वैकुंठास गेले." - आजी.

"आता सुध्दा अधूनमधून विमानकंपन्या कांही वेळा प्रवाशांना थेट वैकुंठाला पोचवतात." - नात उद्गारली.

"छानच, नाहीतरी लोळा गोळा होऊन पडण्यापेक्षा असे वैकुंठाला गेले तर बरेच. आतां या पुढील माझे उरलेले सारे वाढदिवस विमानांतच साजरे करायचे."- आजी.

आतां नातवंडे, त्यापेक्षा त्यांच्या बायका, हबकल्या आहेत! कारण आजीच्या घराण्यांत शंभरीची परंपरा आहे!! ☆☆☆

## संवाद

"सप्टेंबरचा अंक मिळाला. मागील अंकात अधिक वर्गणीदार करण्यासंबंधी निवेदन वाचले होते. त्याचवेळी माझी भगिनी सौ. कमल वासुदेव ताम्हणकर, पेडणे, गोवा यांचेसाठी हितगुजची वर्गणी पाठवण्याचे ठरविले होते. ते काम आज करीत आहे.

श्री. वसंत बाळकृष्ण, सोलापूर यांची सूचना स्तुत्य आहे. कोकणात अधिवेशन घ्यावे या दृष्टीने वेंगुर्ले येथील कुलबांधवांनी पुढाकार घ्यावा यासाठी आम्ही गोवेकर बंधु प्रयत्न करू. कारण गोव्यांत आतापर्यंत दोन अधिवेशने झाली आहेत."

**- कालिदास बाळकृष्ण**, (पृ. ५४१) ढवळी, गोवा.

***अधिवेशनाचा व्याप मोठा असतो. तो प्रामुख्याने 'स्थानिक' मंडळींनाच पेलावा लागतो. यासाठी स्थानिक लोकांचा पुढाकार हवा. प्रवास - निवासादि सर्व सोयीच्या दृष्टीने वेंगुर्ल्याप्रमाणेच चिपळूण, गणपतीपुळे हेहि पर्याय विचारांत घेतां येतील असे वाटते.***

***- संपादक.***

"प्रतिष्ठान व हितगुज यांना छोटीशी भेट पाठवीत आहे. सदरची भेट म्हणजे 'दर्या मे खसखस' आहे - याची जाणीव आहे. तरी हितगुज तंदुरुस्त रहावे अशी प्रामाणिक इच्छा आहे."

**- सुधीर श्रीपाद (पृ. २०) कराड.**

***अशा मनापासून पाठवलेल्या छोट्याछोट्या भेटींतूनच मोठेमोठे निधी जमतात. शंभर वर्षांपूर्वी पैसा फंड काच कारखानाही असाच पैसा-पैसा जमवून उभा राहिल्याचे आपणास माहीत असेलच. - संपादक***



Marathe Pratishthan

# स्वावलंबनाला उत्तेजन

- सौ. नीलांबरी रमेश (पृ. २८०), मानसतज्ञ, पुणे (फोन : ४५६२७०)

***स्वावलंबन ही आयुष्यभर पुरणारी शिदोरी आहे. सवय आणि अनुभवाने स्वावलंबन अंगी बाणवता येते. मुलांना लहानपणापासून आपली कामे आपण स्वत: करायची सवय लावली म्हणजे मुलांच्या ते अंगवळणी पडते. अलिकडे विभक्त कुटुंबपध्दतीत घर व नोकरी अशी तारेवरची कसरत करणाया आईला मुलांकडे पूर्ण वेळ लक्ष देणे अशक्य होते. त्यामुळे स्वावलंबनाला उत्तेजन देणे अत्यंत आवश्यक आहे.***

अगदी लहानपणापासून बऱ्याच मुलांना स्वतःची कामे स्वतः करायची आवड असते. उदा.: माझे दात मी माझ्या हाताने घासणार, मीं माझा भांग पाडणार, मी हाताने कपडे घालणार, मी बूट पायात घालणार असा हट्ट करणाऱ्या मुलांना 'तुला काय येतेयं'? असे म्हणून आपण उडवून लावतो व वेळ वाचविण्यासाठी आपण भराभर ही कामे उरकून मोकळे होतो. अशावेळी आपण मुलांना काम करण्याची संधीच देत नाही. उलट मधेमधे लुडबुड करू नकोस असे म्हणून आपण त्यांना दुखावतो. हे कामाच्या गडबडीत आपल्या लक्षातही येत नाही. मुलांना अशा छोट्या छोट्या कामाची संधी दिली तर सुरवातीला मुले जरा चुकतील. उलटे पालटे करतील. पण तेवढी चूक दुरुस्त करून आपण त्यांना मदत करून स्वावलंबनाला उत्तेजन देऊ शकतो.

अगदी लहानपणापासून मुलावर जर आपण जबाबदारी टाकली तर ते पार पाडू शकतात. त्यांच्या वयानुसार बरीच कामे करायला ते उत्सुक आणि उत्साही असतात. सकाळी झोपेतून उठल्यावर स्वतःच्या पांघरुणाची घडी करून ते जागेवर ठेवणे, आंघोळीला जाताना स्वतःचे कपडे, टॉवेल स्वतः घेणे, आंघोळीनंतर ओले कपडे बादलीत टाकणे, जेवतांना स्वतःचे ताट, वाटी भांडे, पाणी घेऊन बसणे व जेवणानंतर उचलून ठेवणे, शाळेच्या वेळापत्रकानुसार दप्तर भरणे, डबा, वॉटर बॅग आठवणीने शाळेत जातांना बरोबर घेणे, एखाद वेळेस बटण तुटले तर स्वतः लावणे, शर्ट पँट किंवा फ्रॉक उसवला तर स्वतः शिवणे, घरातील स्वच्छता राखण्यास मदत करणे अशी कितीतरी कामे करून मुलांना स्वावलंबनाचा आनंद उपभोगता येतो आणि सवय झाल्यावर मोठेपणी (लग्नानंतरही!) जड जात नाही.

ही जशी स्वतःची कामे झाली तशीच घरातील काही कामे करून मुले पालकांनाही मदत करू शकतात. आपल्या वेळेनुसार दळण आणणे, विजेचे, फोनचे बिल भरून येणे, बँकेत चेक किंवा पैसे भरणे, काढणे अशी छोटी छोटी कामे करून मुलांचा आत्मविश्वासही वाढण्यास मदत होते. बाजारातून मुलांना भाजी, फुलाचा पुडा, दूध, लाँड्रीतील कपडे, किराणामालाच्या दुकानातून काही सामान आणायला सांगितले तर मुले स्वावलंबनाबरोबरच हिशेब करणे, वजनाची माहिती करून घेणे, मालाची निवड करणे, पैसे सांभाळणे अशा कितीतरी गोष्टी नकळत शिकू शकतात. मुलगा अजून लहान आहे, दुकानदार त्याला फसवील असे वाटून त्याला कामाची संधी न देणारेही कितीतरी पालक पहायला मिळतात.

## खुषीपत्रे

सप्टेंबर ९६ चा अंक मिळाला. सदर अंकामधील नापास विद्यार्थी हा लेख फारच छान आहे. अंधारात चाचपडत राहणाऱ्या विद्यार्थ्यांना दीपस्तंभाप्रमाणे वाट दाखविणारा आहे. अशा चांगल्या लेखाबद्दल माझे व मराठे बांधवांचे वतीने सौ. नीलांबरी रमेश यांचे अभिनंदन. हितगुजसाठी छोटीशी भेट पाठवत आहे त्याचा स्वीकार करावा.

**-सुधीर श्रीपाद** (पृ. २०) कराड

'हितगुज' वाचनीय आहे. नापास विद्यार्थी (लेखिका नीलांबरी रमेश) आणि 'अविस्मरणीय अमरनाथ यात्रा' (लेखक दत्तात्रय त्रिंबक) दोन्ही विशेष चांगले आहेत.'

- **डॉ. ह. वि. सरदेसाई**, हृदयरोग तज्ञ, पुणे.

Marathe Pratishthan

**कै. जनार्दन गणेश तथा भाऊसाहेब जाईल व**
**कै. राधाबाई ज. जाईल यांचे स्मृतीस**
**विनम्र अभिवादन**

**श्री. प्रभाकर ज. जाईल** **सौ. विनया प्र. जाईल**
**श्री. अभिजित प्र. जाईल** **सौ. मनीषा प्र. जाईल**
'जुई', जाईलवाडा, टिळक रोड, पनवेल, जि. रायगड.

मुलांना छोट्या छोट्या कामांची संधी उपलब्ध करून दिल्यामुळे स्वकष्टाची सवय लागते. काम करण्याची गोडी निर्माण होते. स्वतःचे काम स्वतः करण्यात कमीपणा नाही हे बीज रुजले जाण्यास मदत होते. एखाद्या गोष्टीसाठी दुसऱ्यांवाचून अडून न बसण्याच्या वृत्तीची जोपासना होते. त्यांचा आत्मविश्वास वाढतो, स्वतंत्र निर्णय घेण्याची शक्ती निर्माण होते. वेळ व श्रम वाचतो. असे अनेक फायदे होऊ शकतात. त्यामुळे स्वावलंबनाला उत्तेजन देतांना आपणही स्वावलंबनाला अनुसरूनच वर्तन करत आहोत ना? हेही पाहणे आवश्यक आहे कारण मुले अतिशय अनुकरणप्रिय असतात. स्वावलंबनाचे महत्त्व सांगताना समर्थ रामदास म्हणतात 'जो स्वयेची कष्टत गेला, तो नर भला रे भला'

पण काही पालक मात्र किरकोळ गोष्टींसाठी मुले आपल्यावर अवलंबून आहेत यातच मानसिक सुख आणि समाधान मानतात. आपला अहंकार फुलवतात, सुखावतात. काही पालकांना मुलांची कामे आपण करण्याची हौसच असते अर्थात नोकरी न करणाऱ्या आयांमधे हे प्रमाण जास्त असते. मुलांना प्रत्येक गोष्ट आयती समोर ठेवण्याची त्यांची प्रवृत्तीच असते. त्यामुळे मुले स्वावलंबनाच्या आनंदाला मुकतात आणि नकळत त्यांना सतत प्रत्येक गोष्टीसाठी आईवर अवलंबून राहण्याची सवयच लागते. असे होऊ नये म्हणून मुलगा स्वतःची कामे स्वतः जर हौसेने करत असेल तर त्याच्यामधे पालकांनी ढवळाढवळ करू नये आणि मुलांना सतत सूचना देऊन एखादी गोष्ट पूर्णत्वाला नेण्यामधे अडथळा आणू नये.

कित्येक वेळा मुलाने काय खावे, कोठे जावे, कोणाबरोबर जावे, कोणते कपडे घालावे, काय, कोठे आणि कसे खेळावे हे सर्व पालक/आईच ठरवते. आईची माया आंधळी असते, तिचा हेतू शुध्द असतो हे सर्व ती प्रेमापोटीच करते. पण त्यामुळे मुले परावलंबी होऊन निर्णय घेण्यात असमर्थ ठरतात, त्यांचे व्यक्तिमत्व खुरटलेले पहायला मिळते. त्यांची यशाकांक्षा कमी झालेली दिसून येते.

मुलगा समजा गर्दीत रस्ता चुकला. बाजारातून आणायला सांगितलेली वस्तू वाटेत हरवली, पडली, वाया गेली, पैसे चोरीला गेले अशा प्रकारच्या जर घटना घडल्या तर रस्त्यात किंवा घरी येऊन रडत न बसता त्यावरील तोडगा किंवा पर्याय मुलाला स्वतः विचार करून ठरवायला प्रवृत्त केले पाहिजे. स्वतःच्या अनुभवातून अनुमानाकडे जाण्यासाठी प्रोत्साहन दिले पाहिजे.

शेवटी एवढेच सांगावेसे वाटते की स्वावलंबन ही एक स्वयंशिस्त आहे. या शिस्तीमुळे मुलांमध्ये नीटनेटकेपणा, सतत कार्यमग्न राहण्याची प्रवृत्ती, किरकोळ गोष्टींसाठी दुसऱ्यावर अवलंबून न राहण्याची वृत्ती अशा कितीतरी गोष्टी अंगी बाणतात. त्यामुळे आजच्या धकाधकीच्या जीवनात मुलांनी स्वावलंबी असणे अत्यंत आवश्यक आहे. आपण स्वावलंबी आहोत ही भावनाच मुलाच्या मनाला निर्भय बनवते.

☆☆☆

## एकमेकां साह्य करू

मी C.A. करण्याचा विचार करीत आहे. मे ९७ मधे Foundation Course परीक्षेला बसणार आहे. यासाठी मला प्रतिष्ठानच्या सभासदांकडून कांही मार्गदर्शन मिळू शकेल काय?
- **आशिश मोरेश्वर (पृ. ५४२)** स्वप्न, मु. शिरसई, पो. थिवी, गोवा ४०३५०२.

***कुमार आशिश याने मार्च १९९६ मधे झालेल्या १२वी (कॉमर्स) परीक्षेत ७८ टक्के गुण मिळवून गोवा बोर्डांत गुणवत्ता यादीत ११वा क्रमांक मिळवला. प्रतिष्ठानच्या C.A. असणाऱ्या सभासदांनी त्याला पत्र पाठवून, मार्गदर्शन काय हवे याबद्दल चौकशी केल्यास त्याची उमेद खचितच वाढेल. थिवी सारख्या आडगावांत याबाबतची माहिती मिळणे दुरापास्त आहे. म्हणून कुलबांधवांना हे खास आवाहन. - संपादक.***



Marathe Pratishthan

# कॅसेटचे फायदे

**- सुधाकर जनार्दन** (पृ. ४५), डॉक्टर ऑफ म्युझिक, पुणे.

माझ्या माहितीप्रमाणे साधारण १९५५ चे आसपास भारतामध्ये कॅसेटयुग सुरू झाले असावे. पुण्यामध्ये काही उच्चभ्रु संगीत चाहत्यांच्या घरी स्पूल पहावयास मिळत असत. मला प्रथम हे मशीन पुण्याच्या डेक्कन कॉलेजचे प्रोफेसर डॉ. सी. आर. शंकरन यांचेकडे पहावयास मिळाले. प्रो. डॉ. शंकरन हे माझ्याकडे हिन्दुस्थानी संगीताचे शिक्षण घेत होते. पुढे त्यांची पत्नी, मुली याही शिक्षण घेऊ लागल्या. साहजिकच त्यांनी माझे काही राग स्पूलमध्ये भरण्यास सुरवात केली. एकंदर ३०/३५ राग त्यांनी टेप केले. रेडिओवरील संगीत कार्यक्रमही त्यांनी टेप केले.

संग्रहाच्या दृष्टीने ज्यांच्याकडे अशी मशीन्स होती त्यांच्याकडे किंवा रेडिओ केंद्राकडे रेकॉर्डिंगची सुविधा होती. प्रगत सुधारणामुळे पुढे ९० मिनिटांच्या ऑडिओ कॅसेट येऊन सामान्य माणसालाही परवडेल असा कॅसेट्सचा जमाना सुरू झाला.

ऑडियो कॅसेटचे फायदे खूपच झाले. कलाकार आपला कार्यक्रम स्वतःच ऐकून सुधारणा करू शकला. दुसऱ्याचे कार्यक्रम टेप करून त्याचा आनंद घेऊ लागला; आपण हजर नसलेल्या कार्यक्रमाचा आस्वाद घेऊ लागला. पुढे पुढे व्हिडिओ टेपमुळे आवडते चित्रपट, तसेच पं. रविशंकर, उ. अलीअकबर, पं. कुमार गंधर्व, उ. बिस्मिल्ला खान वगैरे कलाकारांचे कार्यक्रम घरीच पाहता येऊ लागले. गाजलेली संगीत नाटके, पु. ल. देशपांडे या सारख्यांचे कार्यक्रम व्हिडिओ टेपवरती उपलब्ध होऊ लागले. उच्चभ्रु व सामान्य लोक या दोन्हींचा विचार करून काहींनी या क्षेत्रात धंदेवाईक स्वरूप आणले.

गाणाऱ्यांना तंबोऱ्याची आवश्यकता असते हे पाहून पुरुषांच्या काळी १ किंवा २, बायकांच्या काळी ४ किंवा ५ या स्वरांच्या ६० किंवा ९० मिनिटांच्या कॅसेटस काही लोकांनी काढल्या. हे झाल्यावर ख्यालाच्या अभ्यासासाठी म्हणून ख्यालास एकताल, जलद त्रिताल अशा नुसत्या ठेक्यांच्याही कॅसेट निघाल्या. त्यामुळे एकाच वेळी दोन कॅसेट लावल्याने तंबोरा आणि ख्यालासाठी तालाचीही सोय झाली.

संगीत विशारद, संगीत अलंकार, संगीताचार्य या परीक्षांसाठी शिबिरे सुरू झाली. शिकविणाऱ्या प्राचार्यांची कमतरता जाणून घेऊन या शिबिरांच्या तयार कॅसेटही मिळू लागल्या. यात प्रामुख्याने धन्यवाद देण्यासारखे कार्य केले आहे ते अखिल भारतीय गंधर्व महाविद्यालय मंडळाचे रजिस्ट्रार श्री. बळवंत जोशी यांनी. गेल्या २० वर्षामधील शेकडो गायक गायिकांचे, वादकांचे प्रत्यक्ष कार्यक्रम, विविध संगीत शिबिरांमधील प्रात्याक्षिके [उदा. १९९२ मधील कै. पं. कुमार गंधर्वांनी चार दिवस दिलेले वाशी येथील प्रात्याक्षिकांचे शिबिर] अशा कॅसेटचा यात समावेश आहे. पुण्यातील "गानवर्धन" तर्फेही अशी शिबिरे घेऊन त्यांच्या कॅसेटस उपलब्ध करून दिल्या आहेत.

पुढच्या पिढीला गायन-वादन शिकणं सोपं जावं या हेतूने पुण्याचे पं. अरविंद गजेंद्रगडकर यांनीही असे प्रयोग करून तंबोऱ्याच्या विविध रागांच्या, त्यांतील शंभर शंभर तानांच्याही कॅसेटस उपलब्ध करून दिल्या आहेत.

या क्षेत्रात सर्वात मोठी आघाडी मारली आहे. पुण्याच्या आलूरकर म्युझिक हाऊस यांनी. पुण्यात दरवर्षी होणाऱ्या "सवाई गंधर्व संगीत महोत्सवा" च्या ऑडीओ आणि व्हिडीओ कॅसेटस काढून ते कार्यक्रम वारंवार ऐकण्याची व पाहण्याची सोय करून ठेवली आहे. पैसे टाकावे आणि कोणत्याही वर्षाचा संगीत महोत्सव घेऊन घरी जावे.

वरील प्रकारे आधुनिक युगात कॅसेटचे होणारे फायदे आपण पाहिले. तबल्याच्या ऑडीओ कॅसेटमुळे चुकार तबलजींना जरब बसली. मासिक मानधन घेऊन पूर्वी तालमीच्या साथीला तबलजीही येऊन आपल्याच तंत्राने वागत, रेग्युलर येत नसत. त्याचप्रमाणे दोन तीन वर्षानंतर स्वरज्ञान प्राप्त झाल्यावर तंबोरा घ्यायचा. फ्लॅट सिस्टीमच्या लहान जागेत एक कोपरा व्यापून ठेवायचा. तंबोऱ्यासाठी अडीच हजार रुपये घालवायचे, त्याऐवजी

Marathe Pratishthan

# शांपू - समज आणि गैरसमज

**- सौ. सुनिता राजन** (पृ. ५१३), पुणे.

केसांना शांपू करणे म्हणजे ओल्या केसांवर - डोक्याच्या त्वचेवर शांपू चोळून केस व डोक्याची त्वचा स्वच्छ करणे व शांपू केसातून निघून जाईपर्यंत स्वच्छ पाण्याने केस धुणे - हे मला वाटते आता सर्वांना माहीत आहे! केवळ पन्नास टक्के लोकच शांपू वापरतात कारण शांपूमुळे केस गळतात, पांढरे होतात असा गैरसमज अजूनही लोकात आहे.

साबणाचा किंवा शांपूचा शोध लागण्यापूर्वी केस धुण्यासाठी लोक नदीतील माती, रिठे, शिकेकाई वगैरे जास्त प्रमाणात वापरत. सध्या साबण किंवा साबणाचा बेस असलेला शांपू बरेचदा वापरला जातो. हा हर्बल आहे असे म्हटले जाते. परंतु वस्तुस्थिती अशी आहे की कोणताही साबण हा कोणतेतरी ऑईल किंवा स्ट्राँग अल्कली (उदाहरणार्थ सोडियम हायड्रॉक्साईड) वापरल्याशिवाय तयार होऊच शकत नाही. अल्कलीमुळे केस कोरडे व रखरखीत होतात म्हणून केस धुताना साबण वापरू नये.

केस धुण्यासाठी जर जड पाणी (विहीर-बोअरींगचे) वापरले तर या तेल अल्कलीची एक प्रकारची फिल्म केसांवर तयार होते व पाण्याने निघत नाही. त्यावेळी शेवटच्या पाण्यात थोडे व्हिनेगर किंवा लिंबाचा रस घालावा व ते पाणी केसांवर चोळावे.

आपल्या केसात कार्बन, हायड्रोजन, ऑक्सीजन, नायट्रोजन, सल्फर वगैरे असतो. त्यामुळे सल्फर असलेला शांपू केसांना उपयोगी पडतो. कारण त्यात सल्फ्युरीक ॲसीडवर प्रतिक्रिया करून सल्फोनेटेड फॅरी अल्कोहोल वापरलेले असते. तसेच त्यात तेलही असते.

अेग शांपू व लेमन शांपू लोकप्रिय आहेत. कारण त्यातील लेसिथीन केसांना पोषक आहे. लिंबामुळे शांपूतील अल्कली कमी होऊन ॲसीड बेस तयार होतो व त्याचा Ph वाढतो. तसेच कोंडा होऊ नये किंवा कमी व्हावा यासाठी औषधे असलेले शांपूही फायदेशीर ठरतात. काही देशात शांपूमध्ये पॉलीमर किंवा गम मिसळतात. त्यामुळे केस जाड दिसतात.

शांपूचे कार्य कसे चालते ते आता आपण पाहू. शांपूच्या कणाला २ टोके असतात. त्यातले एक हायड्रोफिलीक म्हणजे पाण्याला खेचून घेणारे असते व दुसरे टोक लायपोफिलीक म्हणजे तेलाला व केसातील धूळ - मळ याला खेचून घेणारे असते. त्यामुळे शांपू व पाणी यांचे मिश्रण झाले की केसांवरील धूळ व तेलकटपणा धुवून काढला जातो. म्हणून शांपू लावण्याआधी केस ओले करावे.

परंतु केस जास्त तेलकट असतील तर प्रथम शांपू लावून केस चोळावे व नंतर थोडे पाणी घालून पुन्हा चोळावे म्हणजे केस लवकर साफ होतील. केस चोळण्याच्या प्रक्रियेत केसांच्या मुळांना मसाज मिळतो. त्यामुळे तेथील त्वचा उत्तेजित होते - रक्ताभिसरण चांगले होते. त्यामुळे केसांचे आरोग्य सुधारते व केस गळायचे थांबून दाट वाढतात.

केस पूर्ण वाढून त्वचेच्या बाहेर येण्यास ४ महिने लागतात व तो नंतर हळुहळु मुळापासून सुटतो व गळून पडतो. त्यावेळी लगेच दुसरा केस त्याची जागा घेतो. त्यामुळे शांपू करताना किंवा विंचरताना जे केस गळतात त्याबद्दल फारशी काळजी करू नये. झोपून उठल्यावर जर उशीवर बरेच केस गळून पडत आहेत असे लक्षात आले तर मात्र त्वरित डॉक्टरांचा सल्ला घ्यावा. हेडमसाज, वाफ, हेअर पॅक, हाय फ्रिक्वेन्सी इन्फ्रारेड वगैरे ट्रिटमेंटमुळे केस गळायचे थांबतात.

☆☆☆

---

**कॅसेटचे फायदे -** **मागील पानावरून**

पंचवीस रुपयांची कॅसेट परवडते. पुढील अभ्यासाला लागणारे मल्हार प्रकार, सारंग प्रकार, कानड्याचे प्रकार एकत्र कॅसेट रूपाने मिळू शकतात.

कलाकारांना घरी बोलावून त्यांची मिजास सांभाळण्यापेक्षा घरी आलेल्या आमंत्रितांसमोर प्रसिध्द कलाकारांची व्हिडीओ कॅसेट लावली की इकडे बिनबोभाट पार्टीही सुरू व इकडे संगीतही. असे हे माझ्या दृष्टीने संगीतजगतातील कॅसेट युगामुळे होणारे फायदे तोटे दिसून येतात.

☆☆☆



Marathe Pratishthan

# संस्कृतचे २१व्या शतकांतील महत्त्व

***संस्कृत भाषेचे २१व्या शतकांतील महत्त्व या विषयावर तीन लेख - संक्षिप्तपणे मागील अंकांत छापले होते. याबाबत दोन वाचकांच्या प्रतिक्रिया.***

## संस्कृतचा प्रसार प्रतिष्ठानच्या कार्यकक्षेत बसत नाही

- **चिंतामण त्र्यंबक** (पृ. २४८), कळवा (जि.ठाणे)

संस्कृत भाषेप्रमाणे इतरहि पुष्कळ बाबी हळुहळु विस्मृतीच्या पडद्याआड जात आहेत. पाली, अर्धमागधी या भाषा पूर्वी शाळेत शिकवत असत. तसेंच मोडी लिपी शाळेत शिकवली जाई. परंतु नवीन शैक्षणिक धोरणानुसार हे सर्व शाळांतून हद्पार झालेच पण आता मराठी अंकाची जागा इंग्रजी अंकांनी घेतली आहे. भारतीय महिन्यांचा वापर शासकीय दिनदर्शिका व पत्रांपुरताच मर्यादित आहे.

सध्या मोडी लिपी शिकवण्यासाठी खाजगी स्वरूपांत वर्ग सुरू आहेत. कीर्तन, प्रवचने शिकवण्यासाठी श्री. नरेंद्रबुवा हाटे यांनी आयनी मेटे येथे शाळा काढली आहे. श्री. व्यं. न. कुळकर्णी जर्मन भाषेचे वर्ग चालवितात. तसेच फ्रेंच, तामिळ, बंगाली भाषांचे वर्ग चालू आहेत हे सर्व खाजगीपणे आहे.

आपल्या प्रतिष्ठानच्या कार्यकक्षेंत संस्कृत भाषेचा प्रसार हा विषय बसत नाही. तथापि विशेष प्राविण्य दाखविणाऱ्या सभासदांच्या मुलांना उत्तेजनपर बक्षिस देण्यास कांहीच हरकत नाही. तसेंच श्री. रमेश भिकाजी स्वतः संस्कृत भाषेच्या वाढीसाठी कांही वर्ग चालू करणार असतील तर तत्त्व म्हणून प्रतिष्ठानने त्यांना पाठिंबा देण्यास हरकत नाही.

☆☆☆

### हसरे हितगुज

(विमानात बसलेल्या दोन प्रवाशांचे संभाषण)

- तूं तिकीट घेतल्यावर थेट विमानांतच आलास. वाटेत विमा काढला नाहींस!

- नाही काढला विमा. आतापर्यंत ७-८ वेळा प्रत्येक प्रवासांत मी विमा काढला. शे पाऊणशे रुपये नाहक गेले विमा हप्त्याचे. एकादाहि विम्याचे लाखभर रुपये मिळाले नाहीत. तेव्हां आतां मी विमान प्रवासांत विमा उतरायचाच सोडलाय!

## संस्कृतचा प्रसार होणे गरजेचे

- **लक्ष्मण पांडुरंग**, (पृ. ५४३), खोताडे, गोवा

संस्कृत भाषेला सर्व भाषांची जननी असे संबोधण्यात येते. ज्या देशामधे संस्कृत भाषेचा जन्म झाला, ज्या भाषेमधे आपली सर्व ग्रंथसंपदा निर्माण झाली, त्या देशामधे संस्कृत भाषा पोरकेपणाने जगत आहे. ही गोष्ट खासच आपणाला अभिमानास्पद नाही.

आजच्या कॉम्प्युटर युगात कॉम्प्युटरसाठी संस्कृत भाषा जास्त उपयुक्त आहे हे सिध्द झाले आहे.

आज जर्मनीमधे संस्कृत भाषा १४ विद्यापीठामधे शिकवली जात आहे. परकीय लोक इथे येऊन संस्कृत भाषा शिकतात व आमच्या संस्कृतीचा अभ्यास करतात. आम्ही मात्र करंटेपणाने स्व विसरून पाश्चात्य झगमगाटाने व विचारांनी प्रभावित होतो. स्वधर्म, स्वसंस्कृती, स्वत्व इत्यादिंच्या जागृतीसाठी संस्कृतचा प्रसार होणे गरजेचे आहे. केंद्र सरकार (आता महाराष्ट्र शासन)

संस्कृतच्या प्रसारासाठी आर्थिक सहाय्य करते. आपण तिथपर्यंत पोचण्याची गरज आहे. संस्कृत भाषेच्या मराठे प्रतिष्ठानने (इतर संस्थाच्या सहकार्याने) एखादी संवर्धनासाठी योजना राबवायची ठरवल्यास मी फुलाची पाकळी म्हणून १ हजार रुपये देणगी म्हणून पाठवीन.

☆☆☆

### हितगुज संवर्धन निधी - आवाहन

येत्या दोन-तीन वर्षांत हितगुज हे ज्ञान-मनोरंजन-प्रबोधन-प्रशिक्षण करणारे सर्वांगपरिपूर्ण मासिक व्हावे असे संकल्पचित्र आहे.

- हे स्वप्नरंजन नाही. सर्वांच्या सहकार्याने ते सहज शक्य आहे. त्यासाठी प्रत्येकाने -

एक नवीन वर्गणीदार नोंदवायचा. माहेरवाशिणींनाही वर्गणीदार करावे. अपत्यप्राप्ती, वाढदिवस, विवाह, पुण्यस्मरण अशा निमित्ताने हितगुज संवर्धन निधीला रु. ५०० देणगी द्यावी.



Marathe Pratishthan

# गुणवंतांच्या पाठीवर कौतुकाची थाप

## १०वी, १२वी, महाविद्यालयीन व अन्य परीक्षांत विशेष यश प्राप्त करून बक्षिस पात्र ठरलेले विद्यार्थी (१९९५-९६)

### इयत्ता १०

१) **श्रध्दा विजय मराठे** (पृ. ९६) पुणे - ७५० पैकी ६८४ गुण - ९१.२०%
(पुणे विभागात गुणवत्ता यादीत १४वी)
२) **कु. कविता नीळकंठ मराठे** (पृ. १६०) मुंबई - ७५० पैकी ६६६ गुण - ८८.८०%
३) **रोहित प्रमोद मराठे** (पृ. ५१३) पुणे - सेंट्रल बोर्ड परीक्षेत ५०० पैकी ४३८ गुण - ८७.६% NTS स्कॉलरशिप प्राप्त.
४) **अल्पना उदय मराठे** (पृ. ३२६) मुलुंड, मुंबई - ७५० पैकी ५७६ गुण - ७६.८०%
५) **दीप्ती अनंत मराठे** (पृ. ४००) वरळी, मुंबई - ७५० पैकी ५४० गुण - ७२%
६) **संपदा विनायक खांबेटे** (पृ. ७०४) बोरिवली. - ७५० पैकी ५३१ गुण - ७०.८०%
७) **राहुल सुरेश मराठे** (पृ. २७९) पुणे - ७५० पैकी ५२५ गुण - ७०%

### इयत्ता १२

८) **श्रीकृष्ण देवीदास मराठे** (पृ. ४७) नागपूर - ६०० पैकी ५६५ गुण - ९४.१७%
(नागपूर विभागात गुणवत्ता यादीत तिसरा)
९) **समीर सुहास मराठे** (पृ. ४१९) किर्लोस्करवाडी - ६०० पैकी ५५४ गुण - ९२.३३%
(कोल्हापूर विभागात गुणवत्ता यादीत सहावा
१०) **ओंकार गोपाळ मराठे** (पृ. ५५३) कराड - ६०० पैकी ५३१ गुण - ८८.५०% (गणितात १०० पैकी १०० - I.I.T. पवईत प्रवेश.)
११) **मनोज रवींद्र मराठे** (पृ. २२०) कर्जत - ६०० पैकी ४८७ गुण ८१.१७%
१२) **आशिश मोरेश्वर मराठे** (पृ. ५४२) गोवा - ६०० पैकी ४६८ गुण ७८%
(गोवा विभाग गुणवत्ता यादीत ११वा.)
१३) **मुक्ता प्रमोदन मराठे** (पृ. ३८८) पुणे - ६०० पैकी ४११ गुण ६८.५०%
१४) **प्राजक्ता प्रमोदन मराठे** (पृ. ३८८) पुणे - ६०० पैकी ४०४ गुण ६७.३५%
१५) **अजित लक्ष्मण मराठे** (पृ. ५४३) गोवा - ८०० पैकी ५२८ गुण ६६%
१६) **समीर दत्तात्रय मराठे** (पृ. ४३९) गोरेगांव, मुंबई - ६०० पैकी ३८४ गुण ६४%

### पदविका

१७) **किरण विनायक खांबेटे** (पृ. ६७६) पुणे - इंडस्टि. इलेक्ट्रानिक्स डिप्लोमा ६६%
१८) **आसावरी दिलीप मराठे** (पृ. ३१५) मुंबई - मुंबई विद्यापीठ - जर्मन डिप्लोमा

### पदवी - पदव्युत्तर

१९) **हेमलता विनायक मराठे** (पृ. २०) वरळी, मुंबई - बी.कॉम. परीक्षेत ७०० पैकी ४२० गुण ६०%
२०) **सुचित्रा सुदाम डोके** (पृ. ३६६) डोंबिवली - - बी.एस्.सी. परीक्षेत ८०० पैकी ५५५ गुण ६९%
२१) **स्वप्ना सुधाकर मराठे** (पृ. ९०) बोरिवली, मुंबई - बी.एस्.सी परीक्षेत ८०० पैकी ४९९ गुण ६२%

Marathe Pratishthan

२२) **अमित अशोक जोगळेकर** (पृ. ३५८) मुंबई (कै. दत्तात्रय बाळकृष्ण यांचा नातू) - B.E. Instrumentation परीक्षेत ७५% गुण मुंबई विद्यापीठात गुणवत्ता यादीत तिसरा

२३) **सीमा लक्ष्मण मराठे** (पृ. ५४३) गोवा - B.E.(Computer) परीक्षेत (गोवा विद्यापीठ) ८५० पैकी ६१२ गुण ७१%

२४) **मनीष रवींद्र मराठे** (पृ. २२०) कर्जत - शिवाजी विद्यापीठ B.E.(Computer) परीक्षेत १५०० पैकी १०५० गुण - ६७.६७%

२५) **कांचन श्रीकांत मराठे** (पृ. १६) अंधेरी, मुंबई - शिवाजी विद्यापीठाच्या B.E.(Electronics) परीक्षेत १५०० पैकी ९४२ गुण - ६८.८०%

२६) **अंजली पद्माकर मराठे** (पृ. २५६) नागपूर - नागपूर विद्यापीठ M.SC. (Zoology) परीक्षेत १००० पैकी ७०८ गुण - ७०.८०%

## विशेष-प्राविण्य

२७) **अमेय अनंत मराठे** (पृ.३५९) ठाणे - डॉ. होमी भाभा बालवैज्ञानिक सुवर्ण पदक.

२८) **सौ. अर्चना अरुण कुलकर्णी** (पृ. ४२७) कोल्हापूर- (प्रतिष्ठानचे सभासद भालचंद्र कृष्ण यांची मुलगी) अखिल भारतीय गंधर्व विद्यालय मंडळ, मुंबई यांच्या कथ्थक नृत्य विशारद परीक्षेत ४०० पैकी ३२१ गुण मिळवून कोल्हापूर केंद्रात प्रथम क्रमांक.

**लग्नानंतर १८ वर्षांनी वयाच्या पस्तीशीनंतरचे हे यश खचितच कौतुकास्पद.**

---

## हास्य

**- सौ. सुलभा अनिल** (पृ. ३२९) कल्याण

त्या हास्यामागे दडले होते, आक्रंदाचे क्रंदन
झिजविली होती तनु तिने, जैसे सुगंधास्तव चंदन

त्या हास्यातच ऊर्मी होत्या, काजळल्या दीपाच्या
त्या ज्योतीस्तव धावत होत्या, कल्पविकल्पना मनाच्या

परि ते हासू 'हासू' नव्हते, होते सारे आसू,
जीवनातल्या सत्यहास्याचा, मार्ग कुणाला पुसू?

---

**देशी ऑफसेट छपाई यंत्राचे आद्य उत्पादक – आता निर्यातीसाठी सज्ज**

## स्विफ्ट्स् लिमिटेड



अंबड, नाशिक येथील विस्तारित प्रकल्प

मराठे उद्योग भवन, आप्पासाहेब मराठे मार्ग, प्रभादेवी, मुंबई ४०० ०२५.

Marathe Pratishthan

७० वर्षांची अविरत सेवा

**धी गिरगांव पंचे डेपो प्रा. लि.**

**लग्नसराई व सणासुदीच्या खरेदीसाठी**
बनारसी शालू आणि सर्व पेठांच्या व प्रकारच्या
रेशमी व सुती फॅन्सी साडया

| | |
|---|---|
| कद, मुगटे<br>पितांबर, उपरणी<br>धाबळ्या, देवी साडया | रग - शाली - चादरी<br>बेडशीट्स -मच्छरदाण्या<br>सर्व मिल्सचं कापड |
| खण, देवजोडे<br>आसने वगैरे<br>सतरंज्या - गालिचे | पंचे जोड्या<br>धोतर जोड्या<br>टॉवेल - नॅपकिन्स |

**गिरगांव दुकान :** पोर्तुगाज चर्चजवळ,
गिरगांव, मुंबई ४००००४. दूरध्वनी : ३८२५९८०

**दादर दुकान:** न.चि. केळकर रोड, दादर,
मुंबई ४०००२८. दूरध्वनी : ४३०११५२.

## या अंकात

१. **वर्धापन दिन समारंभ निमंत्रण** ................. पृ.३
२. **पर्यावरण विशेषज्ञ डॉ. एकनाथ व्यंकटेश** . पृ.५
३. **आजीचा विमानप्रवास-वैकुंठप्राप्तीसाठी** ... पृ.७
**श्री. गजानन भास्कर यांचा वाङ्मयीन फराळ**
४. **स्वावलंबनाला उत्तेजन** ...................... पृ.९
सौ. नीलांबरी रमेश यांचा 'बालक
आणि पालक' मालिकेतला लेख
५. **कॅसेटचे फायदे** .............................. पृ.११
डॉ. सुधाकर जनार्दन, पुणे
६. **शांपू-समज आणि गैरसमज** ................पृ.१२
सौ. सुनिता राजन, ब्युटीपार्लर व्यवसाय तज्ञ
७. **संस्कृतचे २१व्या शतकातील महत्व** ........ पृ.१३
सर्वश्री चिंतामण त्र्यंबक, कळवा आणि
लक्ष्मण पांडुरंग, गोवा यांच्या प्रतिक्रिया
८. **गुणवत्ता पारितोषिकांचे मानकरी १९९५-९६** .पृ.१४
९. **हास्य (कविता)**-सौ. सुलभा अनिल ...... पृ.१५

याशिवाय प्रतिष्ठान वृत्त (पृ.२), सभासद वृत्त (पृ.३,४), खुशीपत्रे (पृ.६,९), संवाद (पृ.८), एकमेकां साह्य करू (पृ.१०), हसरे हितगुज (पृ.१३) ही नेहमीची सदरे.

बुक पोस्ट

प्रति

मराठे प्रतिष्ठान
मराठे उद्योग भवन, आप्पासाहेब मराठे मार्ग,
प्रभादेवी, मुंबई ४०० ०२५.
(दू. नं. ४३०२४५३)

Marathe Pratishthan